स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)
या पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाची स्थूल रूपरेषा

संशोधन विषय

इ.स. १९८० नंतरच्या निवडक कादंबरीतील 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-यांचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास.

संशोधक

कु. स्नेहा व्यंकटराव वाघमारे

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. गणेश रामभाऊ लहाने
(उपप्राचार्य)
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,
लातूर - ४१३५१२

सप्टेंबर- २०२३

इ.स. १९८० नंतरच्या निवडक कादंबरीतील 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-यांचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास.

भूमिका :-

मराठी साहित्याचा अभ्यास करताना मराठीतील विविध साहित्य प्रवाहांचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित गद्य यांचा अभ्यास केला. त्यामध्ये कादंबरी वाङ्मयामध्ये बदल झालेले दिसून येतात. कारण काळानुरूप समस्या बदलतात व या समस्यांचे चित्रण साहित्यात येत असते. त्याला कादंबरी वाङ्मय अपवाद राहिले नाही.

कादंबरी हा मानवी जीवन व्यवहारांचे रूप प्रतिबिंबित करणारा एक आरसा आहे. प्रत्येक कादंबरीच्या घडणीमध्ये तिचे स्वतःचे असे वैशिष्ट्ये सामावलेले असते. प्रत्येक कादंबरीच्या घडणीचे हे स्वतंत्र वैशिष्ट्ये ज्या प्रमाणात आपल्याला जाणवते, त्या प्रमाणात ती कादंबरी आपले लक्ष वेधून घेते. आणि तिच्या घडणीच्या संदर्भात नव्याने विचार करण्यासाठी प्रवृत्त करते.

'कृषिमूलहि जीवनम् ' कृषी हा मानवी जीवन व्यवस्थेचा पाया आहे. आपल्या जीवनाचे मूळ आहे. कृषिप्रधानता ती आदिम स्वरुपाची संस्कृती म्हणून सांगितली जाते. कुणबी किंवा शेतकरी हा ग्रामीण समाजजीवनाचा प्रमुख घटक आहे. नव्या औदयोगिक धोरणामुळे आणि सामाजिक चळवळीमुळे बलुतेदारी मोडली. त्यांना पर्याची नवीन धंदे मिळाले. परंतु शेतीला पर्याय शोधता आला नाही. कुणब्याला शेती सोडवत नाही त्याचे कारण तो मातीला कवटाळून आहे.

' कृषिजीवन ' हा ग्रामीण साहित्याचा महत्वाचा आधार घटक मानावा लागतो. सावकार शेतक-यांचे शोषण करतात. ऊसदर शेतकरी जादा का मागतात? कारखाने परवढत नाही असे का म्हणतात ? या प्रश्नांची उत्तरे अजूनही कोणाला मिळाली नाहीत. साखरेचे दर वाढले की ग्राहकांची ओरड सुरू होते. आणि ऊसाला दर मिळत नाही म्हणून ऊस उत्पादकांचे आंदोलन होत. ऊसाला किमान वैधानिक किंमत मिळावी ही मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची असते. ऊसाला दर मिळत नाही म्हणून शेतकरी हतबल होतात. ऊस दराचा प्रश्न नक्की काय

आहे. याच्याकडे आंदोलन केल्याशिवाय कोणीही लक्ष देत नाही. कित्येक वर्षापासून ऊस दराचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. शेतक-याला उत्पादनावर, खर्चावर आधारित दर हवा आहे.

माणसाच्या स्वभाव धर्माची काही वैशिष्ट्ये व त्याच्या काही गरजा लक्षात घेऊन कोणत्याही कालखंडातील रंजनपर वाङ्मय निर्मितीचे अंदाज बांधलेले असतात. त्याच्या स्वभावधर्माचीही वैशिष्ट्ये व त्याच्या गरजा जोवर कायम आहेत तोवर वास्तववादी कादंबरी निर्मिती देखील सातत्याने व विपुल प्रमाणात होत राहणार आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांच्या समस्या, वेदना याचा वाचकांना या संशोधनातून परिचय करून देण्यासाठी हा विषय मी निवडला आहे त्या दृष्टीने साहित्याचे वाचन करून जुळवाजुळव केली व प्रबंधाची रूपरेषा तयार केली ती पुढीलप्रमाणे.

<u>विषयाचे महत्व आणि निवड :-</u>

ऊस उत्पादक शेतक-यांच्या एकजुटीचा अभाव, साखर कारखाने उशिरा चालू करणे, हार्वेस्टर मशिन आणि मजुरांची संख्या कमी असणे मजुरांचे दुस-या राज्यातील स्थलांतर शिवाय मजुरांच्या बाबतीत, नियोजन आणि नियंत्रणाचा अभाव अशा अनेक उणिवा पुढे येत आहेत. त्यामुळे अतिरिक्त ऊसाचा पेचप्रसंग ओढावला आहे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा असेल किंवा साखर प्रश्नांचा गुंता असेल, चक्काजाम आंदोलन असेल अशा अनेक समस्या त्या शेतक-याच्या समोर दिसून येतात.

उत्पादन खर्चातील वाढ नापिकीने झालेले नुकसान आणि हमीभाव कमी यामुळे कापूस उत्पादक शेतकरी पूर्णपणे अडचणीत सापडला आहे. फायदा न होता लागलेला खर्च देखील निघणे आता कठीण झाले आहे. रोगराई असेल किंवा अतिवृष्टी झालेली असेल यामुळे शेतक-याच्या हातून कापसाचे पीक जाते. त्यामुळे कापूस हे पीक आता 'पांढरं सोनं' राहिलेले नाही.

ऊस आणि कापूस उत्पादन घेऊनही आज या शेतक-यांच्या समस्या दिवसेनदिवस वाढताना दिसून येत आहेत.

साहित्य समाजमन घडवित असते, त्यातून वास्तववादी दृष्टिकोन व समस्यांना तोंड देण्यासाठी जगण्यासाठीचे बळ मिळते. मग ग्रामीण शेतक-याचे प्रश्न, दु:ख विचार मराठी कादंबरीत स्पष्ट झाले आहेत का? मराठी कादंबरीतून या शेतक-यांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण घडते का? या वास्तववादी प्रश्नाच्या उत्तराच्या शोधातून मला निवडक मराठी कादंबरीतील ' ऊस ' आणि ' कापूस ' उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवन चित्रणाचा वेगळा अभ्यास होणे आवश्यक आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

त्यातूनच मी इ स १९८० नंतरच्या "निवडक मराठी कादंबरीतील 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण : एक चिकित्सक अभ्यास" या अनुषंगाने संशोधन करण्याचे ठरविले. प्रस्तुत विषय हा वास्तवादी व महत्वाचा असून तो दुर्लक्षित असल्याचे जाणवले.

संशोधन पद्धती :-

१) निवडक मराठी कादंबरीतील 'ऊस' आणि 'कापूस उत्पादक शेतक-यांच्या जीवनाचा चिकित्सक अभ्यास करणे प्रस्तुत संशोधना मागचा प्रमुख हेतू आहे.

२) प्रस्तुत शोध प्रबंधाच्या संशोधन विषयांचा अभ्यास करताना मी संशोधनमान्य वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.

३) लिखित साधनाच्या वापरामध्ये मुळग्रंथ त्यावरील समीक्षणे, नियतकालिके, मासिके इ. चा वापर केला जाईल.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) मराठी ग्रामीण वास्तववादी कादंबरीचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण शेतक-याच्या वास्तव जीवनाचा व विचाराचा अभ्यास करणे.

३) मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतक-याच्या जीवनसंघर्षाचा अभ्यास करणे.

४) बदलत्या परिस्थितीनुसार शेतकऱ्यांचे जीवन परिवर्तन शोधणे.

५) ऊस आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, प्रश्न जाणून घेणे.

६) मराठी ग्रामीण कादंबरीतील लेखक अरुण जाखडे, सरदार जाधव, मोहन पाटील, रा.रं. बोराडे, विजय दळवी, बाबाराव मुसळे, कैलास दौंड यांच्या कादंबऱ्यातून स्पष्ट होणाऱ्या ऊस आणि कापूस उत्पादक शेतक-यांच्या जीवन चित्रणाचा अभ्यास करणे.

ग्रामीण कादंबरीतील शेतकरी, त्यांचे कुटूंब, अपेक्षा, दु:ख, समस्या यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

१) ग्रामीण शेतक-यांचे वास्तववादी चित्रण कादंबऱ्यात आले आहे.
२) वास्तववादी कादंबरीतून ऊस आणि कापूस उत्पादक शेतकऱ्याचे जीवन चित्रित झाले आहे.
३) ग्रामीण समाजजीवनाचे शेतक-याचे बदलते रूप वास्तववादी कादंबरीने चित्रित केले आहे.
४) समाजात शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा कमीपणाचाच आहे.
५) आजच्या काळातही शेतकऱ्यांचे प्रश्न फारसे सुटलेले नाहीत.
६) आधुनिक कादंबरीने शेतक-यांचे जीवन चित्रित केलेले आहे.

संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा पुढीलप्रमाणे-

या संशोधनात मराठी ग्रामीण कादंबरीकारातील वास्तववादी कादंबरी लेखनाचा शोध ऊस आणि कापूस उत्पादक शेतक-यांच्या विषयास केंद्रभूत ठेवून शेतक-यांच्या जीवनाचा शोध घेतला जाणार आहे. शेतकऱ्यांचे जीवन निसर्गाशी एकरूप झालेले आहे शोध प्रबंधाची मांडणी आपणास पुढील प्रकरणांत करता येईल. अशा प्रकारचे निष्कर्ष या प्रकरणात मांडले आहे. यातील फक्त काही उद्धृत केले आहेत.

संशोधनाची प्रकरणनिहाय विभागणी :-

१) मराठी कादंबरी व ग्रामीण वास्तववादी कादंबरी : एक दृष्टिक्षेप.
२) 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचे कथानके.
३) 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबरीतील व्यक्तिरेखा.
४) 'ऊस' आणि ' कापूस' उत्पादक शेतक-यांच्या समस्या व जीवन संघर्षाचे स्वरूप
५) 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष.
६) उपसंहार

<u>प्रकरण पहिले</u>

मराठी कादंबरी व ग्रामीण वास्तववादी कादंबरी : एक दृष्टिक्षेप

मराठी कादंबरी हा वाङ्मय प्रकार खूप व्यापक विशाल व सर्वसमावेशक आहे. मराठी वाड्:मयात असणारे कादंबरी वाङ्मय प्रकाराचे महत्व विविध मुद्दांव्दारे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण वास्तववादी कादंबरीचे स्वरूप संकल्पना सुरुवात याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे. यात प्राधान्याने 'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-याचे जीवनचित्रण असणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

<u>प्रकरण दुसरे</u>

'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचे कथानके

मराठी ग्रामीण जीवनाचा अभ्यास करताना ग्रामीण शेतक-यांचे प्रश्न, अपेक्षा कुटूंब दु:ख समस्या यांचा अभ्यास मराठी ग्रामीण कादंबरीतून करण्यात आला आहे. शेतक-यांची कुटूंबाच्या उदर्निवाहासाठीची धडपड शेती व्यवसायातील उदासिनता, कर्जबाजारीपणा, आंदोलने अर्थार्जनासाठी करावी लाभणारी धडपड, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांत समाजातील अवहेलना, बेभरवशाचा निसर्ग या घटकांच्या अनुषंगाने सर्व कथानक चित्रित केलेली असून याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

शेतकरी व त्यांचे कुटुंबजीवन, व्यक्तीजीवन, समाजजीवन यांचा अभ्यास स्पष्ट करणारी कथानके मराठी ग्रामीण वास्तववादी कादंबऱ्यात साकारण्यात आलेली दिसून येतात. या कथानकाचे भावविश्व समस्या, जीवनचित्रण मराठी बोली भाषांमध्ये साकारण्याचे मराठी कादंबरीकाराचे कसब अभ्यासूवृत्ती याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

<u>प्रकरण तिसरे :-</u>

'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबरीतील व्यक्तिरेखा

मराठी कादंबरी मध्ये व्यक्तिचित्रण हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कादंबरी वाङ्मय प्रकारात येणाऱ्या व्यक्तिरेखा या त्यांच्या विविध गुण व अवगुणासहित वास्तववादी कादंबरीत चित्रित झालेल्या असतात. त्या त्या व्यक्तिरेखेचे बाह्य वर्णन विविध गुणविशेष, कौशल्ये यांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

मराठी ग्रामीण वास्तववादी कादंबरीतील ऊस आणि कापूस उत्पादक शेतक-यांचे जीवनचित्रण करणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये स्त्री व्यक्तिरेखा व पुरुष व्यक्तिरेखा अशी विभागणी केली आहे या व्यक्तिरेखामध्ये कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी कामासाठी भटकणाऱ्या, शेतीत राबणाऱ्या, संसारासाठी पैशाची तडजोड करणाऱ्या, स्वप्नांचा त्याग करणाऱ्या संकटांना सहन करत जगणाऱ्या व्यक्तिरेखाचा समावेश होतो.

ह्या सगळ्या व्यक्तिरेखा आपल्या आयुष्यात आलेली संकटे सहन करत जगतात यातील काही दयाळू आहेत, तर काही बेरकी, काही निष्पाप आहेत, तर काही चतुर, काही अहोरात्र कष्ट करणारी आहेत, तर काहीजण काहीही काम न करता बसून राहणारी आहेत. परंतु या सगळ्या व्यक्तिरेखांमध्ये एक समानता आहे. ती म्हणजे या कोणत्याही व्यक्तिरेखामध्ये अमानवी शक्ती दैवी शक्ती नाही, तर सहज आजूबाजूला दिसणारी प्रवृत्ती आहे.

<u>प्रकरण चौथे :-</u>

'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-यांच्या समस्या व जीवन संघर्षाचे स्वरूप

मराठी कादंबरीत ग्रामीण वास्तववादी जीवनचित्रण करून कांबरीकारांनी शेती व शेतकऱ्याच्या संदर्भातील विषय लेखनात आणले आहेत. त्यापैकी शेतक-याचे जीवनचित्रण करत असताना त्यांना ज्या अनंत समस्यांना सामोरे जावे लागले, त्या समस्यांच्या मुलभूत कारणांचा शोध घेताना असे दिसून येते की, शेती व्यवसायातील उदासीनता, बेभरवशाचा निसर्ग, कर्जबाजारीपणा, आंदोलने साखर प्रश्नांचा गुंता समस्या व संघर्षाने शेतकऱ्याचे जीवन व्यापलेले दिसून येते.

या अनेक समस्या सोडविण्यासाठी शेतक-यांना कसा संघर्ष करावा लागतो, याचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

सर्वच ठिकाणी बेरोजगारीची झळ सोसणारा शेतकरी वर्ग शेतीमध्ये वेगवेगळे उत्पन्न घेण्याचे ठरवतो पण अनियमित पावसामुळे दुष्काळी परिस्थितीची समस्या शेतक-यांना भेडसावत आहे. अशा स्थितीत सापडलेल्या शेतक-यांच्या जीवनसंघर्षाचे स्वरूप प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट केले आहे.

<u>प्रकरण पाचवे :-</u>

'ऊस' आणि 'कापूस' उत्पादक शेतक-यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन विशेष

मराठी कादंबरी वाङ्मय प्रकार मुळातच व्यापक स्वरुपाचा असल्यामुळे या वाङ्मय प्रकाराची भाषा ही प्रभावी, बोलकी, मनोरंजक व समस्यांचे चित्रण करणारी आहे. त्याचबरोबर उपमा, प्रतिमा, अलंकार, ग्रामीण बोली भाषेतील अनेक म्हणी, वाक्यप्रचार, ग्रामीण विविध बोलीभाषा यांचे प्रत्यंतर शेतकऱ्याचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबरी वाङ्मयात दिसून येते.

शेतकऱ्यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये सावकाराचा बंडखोरपणा उसाला कमी दर, स्त्रीयांची होणारी घुसमट, दुःख, वेदना स्पष्ट करणारी बोलीभाषा, शेतक-यांची घुसमट, आंदोलने साखर प्रश्नांतील गुंता या कादंबऱ्यामधून विविध छटांनी स्पष्ट केली .

सारांशाने असे म्हणता येईल की, शेतक-यांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंब-यांची भाषा ही, व्यक्तीनुसार, प्रदेशानुसार, वयानुसार, लिंगानुसार बदलेली दिसून येते. त्याच बरोबर शेती व्यवसाय निसर्गवर्णन, कादंबरीतील वातावरण निर्मिती यांचाही या प्रकरणात अभ्यास केला आहे.

प्रकरण सहावे

उपसंहार

एकंदरीत शोध प्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये केलेले संशोधन व त्या संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष यांची मांडणी या प्रकरणात केली आहे.

'ऊस' आणि 'कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे जीवनचित्रण स्पष्ट करणाऱ्या कादंबऱ्यांच्या आधारे काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे सांगता येतील.

निष्कर्ष :-

१) शेतकऱ्यांचे दु:ख स्पष्ट केले असून त्याचे वर्तन या दु:खाने कसे सुन्न होते ते कादंबरीत दिसून येते.

२) शेतक-यांचे भयावह अनुभव व शेती करण्यासाठीचे कष्ट, अनुभव रेखाटन केले आहे.

३) शेतक-यांना शेती करण्यासाठी कर्ज मिळत नाही सावकारांचा दबाव झेलावा लागतो.

४) शेतक-यांची मनोव्यथा साकार करून विविध समस्या स्पष्ट केलेल्या आहेत.

५) शेतक-यांचा जीवनसंघर्ष, त्याची जगण्याची पद्धत, शेती करताना पावलोपावली परिस्थितीशी करावी लागलेली तडजोड व शेवटी शेती करुनही पदरी पडलेली निराशा हे त्याच्या जीवनातील वास्तव कादंबरीत मांडलेले दिसून येते.

६) कादंबरीत अनेक ग्रामीण बोलीभाषांचा समावेश असून त्यातून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडलेले दिसतात.

७) कादंबरीतील व्यक्तिरेखा या सपाट कागदावरुन उसकून थेट वाचकांच्या मनाचा शोध घेणाऱ्या दिसतात.

८) शेतक-याचे त्याच्या कुटुंबाच्या वाट्याला आलेल्या भोगाचे यथार्थ चित्रण कादंबरीत दिसून येते.

९) ग्रामीण शेतक-यांच्या जीवनसंघर्षाचे वर्णन स्पष्ट करणाऱ्या कादंबरीचे सगळ्यात महत्वाचे बलस्थान तिच्या भाषाशैलीत आहे.

१०) नापिक, दुष्काळामुळे शेतीत उत्पन्न निघत नाही अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या मनाची घालमेल कादंबऱ्यात दिसुन येते.

११) या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनावर सर्वांगिण प्रकाश पडतो. शेतक-यांच्या शोकांत कहाणीचे दर्शन त्यातून घडते.

१२) अभ्यासित कादंब-यांच्या आधारे असाही निष्कर्ष निघतो की या कादंब-यांचे लेखन जिवंत प्रत्ययकारी व वास्तवदर्शी झाले आहे.

१३) ग्रामीण, मराठी कादंब-यातून कर्जबाजारी शेतक-यांचे जीवनसंघर्ष अनेकविध परिणामांसह चित्रित केलेला दिसून येतो.

१४) बोलीभाषेतील शब्दसंपती, म्हणी, वाक्यप्रचार, प्रतिमा यामुळे भाषीक सौंदर्य वाढले आहे.

१५) एकूणच समस्या सांगणाऱ्या या कादंबऱ्याची भाषा कधी अगतिक तर कधी आक्रमक होताना दिसते.

आधारभूत कादंबऱ्या :-

१) पाचरुंट	-	अरुण जाखडे
२) साखरेफेरा	-	मोहन पाटील
३) रिक्त अतिरिक्त	-	रा. रं. बोराडे
४) कोयता	-	सरदार जाधव
५) साखरशाही	-	विजय दळवी
६) ऊसकोंडी	-	डॉ. श्रीकांत
७) साखरइंगळया	-	डॉ. भास्कर बडे
८) कापूसकाळ	-	कैलास दौंड
९) हाल्या हाल्या दुधू दे	-	बाबाराव मुसळे

संदर्भ ग्रंथसुची :-

१) ग्रामीण साहित्य : स्वरुप व समस्या	—	डॉ. आनंद यादव
२) मराठी कादंबरी इतिहास	-	चंद्रकांत बांदिवडेकर
३) ग्रामीण साहित्य व वास्तव	-	डॉ. आनंद यादव
४) ग्रामीण साहित्य : स्वरुप व प्रेरणा	—	वासुदेव मुलाटे
५) मराठी कादंबरी : पहिले शतक	-	कुसुमावती देशपांडे
६) कादंबरी : एक वाङ्:मय प्रकार	-	जान्हवी संत
७) मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)	-	प्रभाकर बापट, नारायण गोडबोले
८) कादंबरीची रचना	-	कुलकर्णी श्री. मा.
९) वाङ्:मयीन संज्ञा : संकल्पना कोश	-	रमेश वरखेडे, आशा राजवाडे, वसंत डहाके, जया दडकर
१०) कादंबरी विवेचन आणि विश्लेषण	-	देशपांडे बालशंकर
११) ग्रामीण साहीत्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान	-	डॉ. शेलार सुधाकर
१२) साहित्य व समाजजीवन	-	लालाजी पेंडसे
१३) ग्रामीण दलित व स्त्रीवादी साहीत्य	-	डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, शरणकुमार लिंबाळे
१४) ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध	-	डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
१५) ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन	-	डॉ. गुदेकर श्रीराम

मार्गदर्शक
प्रा. डॉ. गणेश रामभाऊ लहाने
(उपप्राचार्य)
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,
लातूर.

संशोधक
कु. स्नेहा व्यंकटराव वाघमारे